<u>तक्ता अ</u>

## -: जाहीर नोटीस :-

### अर्थ व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय,सोलापूर,

### जा.क्र. /3092/ 2024, दि. १०/०९/ 2024.

जिल्हा तथा तालुका न्यायालयात प्रस्थापील व्ही.सी. प्रणाली कार्यान्वीत करणेकामी आवश्यक **"HDMI Splitter (1 Input + 2 Output)" एकूण 68 नग खरेदी** करणेकामी अधिकृत विक्रेते व सेवा पुरवठादार यांच्यामार्फत दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

**नियम व अटी**

१. **जिल्हा तथा तालुका न्यायालयात प्रस्थापीत व्ही.सी. प्रणाली कार्यान्वीत करणेकामी आवश्यक HDMI Splitter (1 input + 2 Output) एकुण 68 नग** खरेदी कामी अधिकृत विक्रेते व सेवा पुरवठादार यांचेकडून दरपत्रक मागविणेकरीता ही जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (7) सात दिवसात म्हणजेच दि. 23/09/2024 रोजी सकाळी 10.30 पासून ते दुपारी 04.30 वाजेपर्यंत मोहोरबंद निवीदा मा. जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे सादर करावे.

२. सदर निवीदा "प्रबंधक कार्यालयात" मा. अध्यक्ष, जिल्हा संगणक समिती, जिल्हा न्यायालय, सोलापूर यांच्या नावाने बंद लखोट्यात सादर करावे. टपालाव्दारे अथवा ईमेलव्दारे निवीदा स्वीकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३. सदर बंद लखोट्यावर **"QUOTATION FOR HDMI SPLITTER PURCHASING"** असे नमुद करण्यात यावे.

४. निविदाकारांनी वस्तुंचे वॉरंटी/गॅरंटी देणे बंधनकारक असून व तसा निविदेत नमूद करणे आवश्यक राहील.

५. वस्तु हे उच्च दर्जाचे (OEM) कंपनीचे असणे आवश्यक आहे.

६. निविदा व साहित्य कार्यालयापर्यंत पोहचविण्याचा खर्च अनुज्ञेय होणार नाही.

७. निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर GST /SGST क्रमांक नमूद करावे. तथापी, GST /SGST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमूद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.

८. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र GST टॅक्स असल्यास त्याचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक द्यावे लागेल तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार TDS कपात करण्यात येईल.

९. दरपत्रक स्विकृतीचा आदेश दिल्यानंतर नमूद वस्तु तात्काळ पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१०. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

११. प्राप्त निवीदा मंजूर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा तसेच पुरवठा आदेश देवूनही नमुद वस्तूंचा पुरवठा मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार "मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय, सोलापूर" यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.

**आदेशावरुन,**

**कनिष्ठ लिपीक** | **सहा. अधिक्षक,** | **प्रबंधक,**

**जिल्हा न्यायालय,सोलापूर.**

DISTRICT COURT OF SHOLAPUR
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट सोलापूर